# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०२ ऑक्टोंबर/२०२२ (रविवार)

---

## जिवेनिशी ठार करण्याचा प्रयत्न करणा—या विरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन कुही** :— अंतर्गत मौजा सालई ०९ किमी दक्षिण. दिनांक ०१/१०/२२ चे १३.०० ते १३.०० वा. दरम्यान, यातील फिर्यादी हा नातेवाईकाच्या मयतीच्या कार्यक्रमाकरीता मौजा सालई येथे गेला होता. मयतीचे लाकडे ठेवत असतांना यातील आरोपी नामे— भिवा रामक्रिष्णा मांढरे रा. सालई हा फिर्यादीचे जवळ जावून बडबड करीत होता. तेव्हा फिर्यादीने त्यास म्हणाला की, ”मयत सुरु आहे बडबड कशाला करते“. असे म्हणाला असता, आरोपीने त्याचे जवळील असलेला चाकु बाहेर काढुन फिर्यादीचा जिव घेण्याच्या उद्देशाने कमरेवर व पोटाच्या खाली मारुन गंभीर दुखापत केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अनुप शामराव मंडपे वय ३७ वर्ष रा. वार्ड नं. १२ कुही जि. नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी नामे— भिवा रामक्रिष्णा मांढरे रा. सालई याचेविरूध्द कलम ३०७ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास — पोलीस उपनिरीक्षक श्री देविदास ठमके पो.स्टे.कुही मो .८७८८५५३१३९ हे करीत आहे.

## रेती चोरी करणा—या विरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— अंतर्गत मौजा बीना संगम शीवार. दिनांक ०१.१०.२२ चे ०४.५० वा ते ०५.३० वा दरम्यान, यातील आरोपी नामे— १) प्रफूल दूयोधन बल्की वय ३३ वर्ष रा बीना संगम हा आपल्या ताब्यातील बोलेरो पीकअप गाडी चे डाल्यात विना परवाणा बीना संगम घाटातुन रेतीची चोरटी वाहतुक करतांना मीळुन आल्याने त्याच्या ताब्यातुन एक ब्रॉस रेती कीमती ४,०००/— **रू व एक बोलेरो पीकअप गाडी क्र एम एच ४० डीजे १४३७ कीमती ४,००,०००/— रू असा एकुण ४,०४,०००/—रू चा माल** तसेच आरोपी क्र २) रमजान शेख समशेर शेख रा बीना संगम यांचे ताब्यातुन हा आपले बोलेरो पीकअप गाडी चे डाल्यात वीना परवाणा रेती वाहतुक करतांना मीळुन आल्याने त्याच्या ताब्यातुन **एक ब्रॉस रेती कीमती ४,०००/— रू व बोलेरो पीकअप गाडी क्र एमएच ४० बीजी ५८८१ कीमती ३,००,०००/— रू असा एकुण ७,०८,०००/—रू चा माल** जप्त केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरतर्फे पो हवा उमेश ठाकरे पोस्टे खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी नामे— १. **प्रफूल दूयोधन बल्की वय ३३ वर्ष रा बीना संगम २. रमजान शेख समशेर शेख रा बीना संगम** यांचे विरूध्द कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा उमेश ठाकरे पोस्टै खापरखेडा मो नं ९८२२७६४९९९ हे करीत आहे.

# बैल चोरी

<u>**पोलीस स्टेशन काटोल**</u> :— अंतर्गत मौजा बोरडोह शिवार. यातील फिर्यादी यांची शेती बोरडोह शिवारात असून शेतातील कोठ्यात बैलजोडी बांधुन ठेवतात. फिर्यादीची बैल जोडी दिनांक ०१/१०/२२ रोजी ०९.०० वा दरम्यान, बैल जोडीला चारून, त्याच शेतात बाजुला असलेल्या झुडपाला दोन्ही बैल बांधुन पाणी पिण्याकरिता बाजुलाच असलेल्या शेतातील झोपडीत गेले, व पाणी पिवून थोडा वेळ झोपडीत थांबुन सकाळी ०९/३० वा दर. शेतात आउत धरण्याकरिता बैलजोडी बांधुन ठेवलेल्या ठिकाणी गेले असता फिर्यादीचे **पांढ—या रंगाची बैल जोडी किंमती ५०,०००/— रूपये बांधुन ठेवलेल्या ठिकाणी झुडुपाला दिसली नाही**. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— दिनकर मानीकर कराळे वय ५४ वर्ष रा. ढवळापुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास — म पो हवा/ ज्योती सेवतकर मो न ९५५२५५६३४१ हे करीत आहे.

## <u>दुखापत</u>

<u>**पोलीस स्टेशन वेलतुर**</u> :— अंतर्गत मौजा खेंडा १५ किमी पश्चिम. यातील फिर्यादी हे गावातील रामेश्वर डहाके यांचे घरी बसले असता, दिनांक ०१/१०/२२ चे १९/३० ते १९/४० वा. दरम्यान, यातील आरोपीने फिर्यादीस “तु मला काल का शिवीगाळ केली” असे म्हणुन आरोपी तुषार गुरूदेव लांजेवार वय अंदाजे २२ वर्ष रा. खेंडा यांनी फिर्यादीला शिवीगाळ करून कु—हाडीच्या दांडयाने फिर्यादीच्या डाव्या हाताला, डोक्यावर व डाव्या कुशीवर मारून गंभीर जखमी केले,

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— तुषार गुरूदेव लांजेवार वय अंदाजे २३ वर्ष रा. खेंडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३२६, ५०४, ५०६ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— मधुकर सुरपाम मो. ९४६४७१५६५८ हे करीत आहे.

## <u>घरफोडी</u>

<u>**पोलीस स्टेशन नरखेड**</u> :— अंतर्गत केवळराम पिपळा. यातील फिर्यादी हा दि ३०.०९.२२ रोजी चे रात्री आपले मेडीकल बंद करून घरी गेले. व दिनांक ३०/०९/२२ चे २१/४५ ते दिनांक ०१/१०/२२ चे ०७/३० वा दरम्यान, फिर्यादीचे मेडीकल मधील कोणीतरी अज्ञात चोराने ३,०००/— रू चे टॅबलेट तसेच गाडीचे कागदपत्र सिसिटीव्ही कॅमेराचे मशीन कि २,५००/— रू तसेच मडक्यात असलेले ४,०००/—रू असा एकुन ९,५००/— रू तसेच त्याचे दुकानापुढे असलेले किराना दुकाना मध्यें असलेले काउटंर मधुन नगदी ४,०००/— रू, जुने चांदीचे १५० शिक्के कि १०,०००/— रू, जुने सोन्याचे १० ग्रॅम वजनाचे ४ नग डोळे कि ६,०००/— रू तसेच पावर बॅक स्मॉर्ट वॉच कि. १,०००/— रू असा एकुन ३०,५००/— रू चा माल कोनीतरी अज्ञात चोराने रात्री दर चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— लोकेश वासुदेवराव बारमासे वय ३४ वर्ष रा. केवळराम पिपळा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ४५७, ३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पो हवा धनराज भुक्ते मो क्रं ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे
मो क्र ९४२२६१४६३३
पोलीस माहीती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर